क्र.२/नसचि/प्रशासक/ ०१/२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- १५ सप्टेंबर २०२३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - ०१/२०२३-२०२४

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि.१८/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील नगरमंडळ सर्वसाधारण सभा दि.१७/०८/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे चौक/रस्ते/दुभाजक/खुले भूखंड यांचे लोकसभागातून सुशोभिकरण करणेकरिता विषयपत्रातील नमुद अधिकारी यांची समिती निश्चित करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१३/०९/२०२३ चे विषयपत्र.**

३. मागील नगर मंडळ अस्तित्वात असताना प्राप्त प्रलंबित असलेल्या विषयपत्रांवर निर्णय घेणे. (सोबत विषयपत्र सूची)

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२३-२४ दिनांक :- १८/०९/२०२३ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.०१ दि.१८/०९/२०२३ रोजी महापालिकेच्या पद्मभूषण डॉ.वसंतराव दादा पाटील सभागृह,सांगली येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.संजय ओहोळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज
३.	श्री.राहुल रोकडे – उपायुक्त,सांगली	४.	श्रीम.स्मृती पाटील – उपायुक्त,मिरज
५.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता	६.	श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक
७.	श्री.सुशिलकुमार कंबळे - लेखापाल	८.	श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी
९.	श्री.चिदानंद कुरणे - कार्यकारी अभियंता, पा.पु./ जल.वि.	१०.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड
११.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी (आस्था.)	१२.	श्री.अशोक माणकापुरे- प्रशासकीय अधिकारी
१३.	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर	१४.	श्री.नितीन शिंदे- मालमत्ता व्यवस्थापक / कर निर्धारक,संकलक
१५.	श्री.तेजस शहा - ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,सांगली	१६.	श्री.विनायक जाधव-ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,मिरज
१७.	श्री.सचिन सागावकर – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.२	१८.	श्रीम.उज्वला शिंदे– सहा.आयुक्त,प्र.स.क्र. ३
१९.	श्री.अनिस मुल्ला – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४	२०.	श्री.आप्पा हलकुडे - नगर अभियंता,सांगली
२१.	श्री.सुनिल पाटील - विशेष कार्यकारी अधिकारी,पा.पु.वि.	२२.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष
२३.	श्री.धनंजय हर्षद - जनसंपर्क / विधी अधिकारी	२४.	श्री.रविंद्र ताटे – आरोग्याधिकारी,मिरज
२५.	श्री.सुनिल माळी – अग्निशमन अधिकारी	२६.	श्री.शंकर भंडारे – ग्रंथपाल,सांगली
२७.	श्री.वैभव वाघमारे – नगररचनाकार,सांगली	२८	श्री.जेलर - क्रिडा अधिकारी
२९.	श्री.गुजर – पर्यावरण अभियंता	३०.	श्री.रंगराव आठवले - प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग
३१.	श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियंता		

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१ मागील नगरमंडळ सर्वसाधारण सभा दि.१७/०८/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

प्रशासक मागील नगरमंडळ सर्वसाधारण सभा दि.१७/०८/२०२३ रोजीचे सभेतील कार्यवृत्त कायम करणेत येत आहे.

विषय क्र. ०२ सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे चौक/रस्ते/दुभाजक/खुले भूखंड यांचे लोकसभागातून सुशोभिकरण करणेकरिता विषयपत्रातील नमुद अधिकारी यांची समिती निश्चित करणेस मान्यता देणे

उपायुक्त (मुख्यालय)	पुर्वी महापौर,उपमहापौर, आयुक्त यांच्या कमिटीच्या मान्यतेने देत होतो. आता नगरमंडळ अस्तित्वात नसल्याने, कमिटीचे पुर्नगठण करणेचे आहे. सहा सदस्यांची कमिटी करणेचे आहे.
मालमत्ता व्यवस्थापक	मनपा मालमत्ता विभागाकडे यांची नोंद व्हावी
उपायुक्त (कर)	या कामी SOP तयार करु.
प्रशासक	महापालिकेने ओपन स्पेस संस्थांना दिले आहेत त्याची एकत्रित यादी करुन, माहिती दयावी. उपायुक्त, मालमत्ता यांना ॲग्रीमेंटचे अधिकार देणेत येत आहेत. समिती गठीत करणेस मान्यता देणेत येत आहे.
विषय क्र.०३	मागील नगर मंडळ अस्तित्वात असताना प्राप्त प्रलंबित असलेल्या विषयपत्रांवर निर्णय घेणे.
प्रलंबित विषय क्र.०१	सांगली व मिरज भुयारी गटार योजना टप्पा क्र.२ भाग २ काम वेळेत पुर्ण करत नसल्याने ठेकेदारावर ठोस कारवाई करुन ठेकेदारास काळ्या यादीत टाकणेबाबत
प्रशासक	प्रशासनाने विषयपत्र दि.०१/०७/२०२२ रोजी दिलेले असलेने, त्यांनतर सदर योजने कामी संबंधीत ठेकेदार यांनी काय कार्यवाही केलेली आहे. कोणती कामे पुर्ण व कोणती अपुर्ण आहेत याबाबत जलनि:सारण विभागाने कामाच्या सद्यस्थितीबाबत वस्तुनिष्ठ सखोल सविस्तर अहवालासह फेरप्रस्ताव सादर करावा.
प्रलंबित विषय क्र.०२	सांगली येथील सि स नं.६४१०/१८,६४१०/१९ (स.नं.२६०) या जागेवरल आ.क्र.१०४व्हेजीटेबल मार्केट व जनता बझार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अंतर्गत संपादनाबाबत
प्रशासक	सदर भूसंपादन करणेस TDR देवून भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.
प्रलंबित विषय क्र.०३	महानगरपालिका क्षेत्रातील शाळा / वर्ग खोल्या अंगणवाडी वर्गासाठी दिलेबाबत
प्रशासक	अहवाल अवलोकनी घेणेत आला.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- १८/०९/२०२३

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

नगरसचिव विभाग

मा.महासभा प्रलंबित विषयपत्र सूची

अ.क्र.	विभागाचे नाव	कामाचे नाव	विषयपत्र दाखल दिनांक
१.	जलनि:सारण विभाग	सांगली व मिरज भुयारी गटार योजना टप्पा क्र.२ भाग २ काम वेळेत पुर्ण करत नसल्याने ठेकेदारावर ठोस कारवाई करुन ठेकेदारास काळ्या यादीत टाकणेबाब	०१/०७/२०२२
२.	नगररचना विभाग	सांगली येथील सि स नं.६४१०/१८,६४१०/१९ (स.नं.२६०) या जागेवरल आ.क्र.१०४व्हेजीटेबल मार्केट व जनता बझार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अंतर्गत संपादनाबाबत निर्णयार्थ	२१/०२/२०२३
३.	शिक्षण विभाग	महानगरपालिका क्षेत्रातील शाळा / वर्ग खोल्या अंगणवाडी वर्गासाठी दिलेबाबत	०३/०८/२०२३

१) मागील दि. १७.५.२३ रोजीच्या [illegible] कायम करणे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०१ **दिनांक :- १८/०९/२०२३**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील नगरमंडळ सर्वसाधारण सभा दि.१७/०८/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.६२८ ते ठराव क्र.६५३ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०२ **दिनांक :-** १८/०९/२०२३

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१३/०९/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणचे चौक/रस्ते/दुभाजक/खुले भूखंड यांचे लोकसभागातून सुशोभिकरण करणेकरिता सद्यस्थितीत महापालिकेत प्रशासक नियुक्त झालेमुळे खालील प्रमाणे नमुद अधिकारी यांची समिती गठीत करणेत येत आहे.

१. प्रशासक तथा आयुक्त :- अध्यक्ष
२. उपायुक्त,मुख्यालय :- सदस्य
३. उपायुक्त,मिरज :- सदस्य
४. उपायुक्त,मालमत्ता :- सदस्य
५. सहा.संचालक नगररचना :- सदस्य
६. शहर अभियंता :- सदस्य सचिव

उपरोक्त समितीने सदर कामीच्या मंजुर शर्ती-अटीस अधीन राहून, लोकसहभागातून सुशोभिकरणासाठी मान्यता देणेची असून, यासाठी आवश्यकतेनुसार सुधारीत नियमावली तयार करुन त्यानुसार कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०३ **दिनांक :-** १८/०९/२०२३

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.०१/०७/२०२२ चे मागील नगर मंडळ अस्तित्वात असताना प्रलंबित असलेल्या विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत सांगली व मिरज भुयारी गटार योजना टप्पा क्र.२ भाग -२ या कामाचे मंजूर ठेकेदार हे योजनेचे काम वेळेत पुर्ण करणे आवश्यक असताना, काम पुर्ण करणेस उदासिन असून, सदर ठेकेदारास वारंवार सुचना देऊन सुद्धा कामामध्ये प्रगती दिसुन येत नसलेने, सदर कामाचे मंजूर ठेकेदार एस.एम.सी.इन्फ्रा.प्रा.लि.ठाणे यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ठ करुन, (Risk & Cost) खाली काम काढून घेवून, अन्य ठेकेदाराकडून काम पुर्ण करुन घेणेकामी आलेल्या प्रस्तावाबाबत संबंधीत विभागाने सदर कामगिरीच्या सद्यस्थितीबाबत वस्तुनिष्ठ सखोल सविस्तर अहवालासह फेरप्रस्ताव सादर करावा असे आदेशित करणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

जलनि:सारण अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०४ **दिनांक :-** १८/०९/२०२३

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२१/०२/२०२३ चे मागील नगर मंडळ अस्तित्वात असताना प्रलंबित असलेल्या विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली येथील सि.स.नं.६४१०/१८, ६४१०/१९ (स.नं.२६०) या जागेवरील आरक्षण क्र.१०४ व्हेजिटेबल मार्केट व जनता बझार या आरक्षणा खालील क्षेत्र ११४५.० चौ.मी. जागेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अंतर्गत खरेदी सूचना बजावली होती. त्यानुसार मा.शासनाने दि.२२/०७/२०१९ च्या पत्रान्वये ४९ (४) अन्वये सूचना कायम केलेचे कळविले होते. त्यानुसार मा.महासभा ठराव क्र.१८ दि.१६/०७/२०२० अन्वये विषयांकीत क्षेत्र एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.११ (समावेशक आरक्षण) चे माध्यमातून विकसीत करणेस मान्यता दिलेली होती. तथापि, क्षेत्रधारकांनी दि.२२/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये रोख स्वरुपात मोबदल्याची मागणी केलेली आहे. उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, सदर जागेचे भूसंपादन कामी क्षेत्रधारक यास टी.डी.आर. देवून, भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधीत विभागाने विहित पद्धतीने करावी.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स.स.ज.र.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०५ **दिनांक :-** १८/०९/२०२३

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (शिक्षण विभाग) यांचे दि.०३/०८/२०२३ चे मागील नगर मंडळ अस्तित्वात असताना प्रलंबित असलेल्या विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिकेने ज्या शाळा इमारती अंगणवाडीकरीता दिलेल्या आहेत त्याबाबतचा अहवाल मागणी करणेत आलेला होता. त्यानुसार प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार शाळा नं.२६ मधील दोन खोल्या अंगणवाडी वापराकरीता देणेत आलेल्या आहेत. याशिवाय अन्य कोणत्याही शाळा मधील खोल्या अंगणवाडीकरीता देणेत आलेल्या नाहीत. सदरचा अहवाल अवलोकनी घेणेत आला.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रशासन उपायुक्त (शिक्षण)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका